# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in Distress Situation**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **30/09/2022**

**Brief of the work done :-**

मुलीवर चाकूने प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपीस मानोरा येथे अटक.

## सोयरीक मोडल्याच्या कारणावरुन मुलीच्या गळयावर चाकुने वार

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ▪ कारंजा शहरांतील नेहरु चौक येथे सोयरीक मोडल्याच्या कारणावरून गौतम नगर येथील आरोपीने मुलीचे केस पकडून खाली पाडले व तिच्या गळयावर चाकूने वार करून जबर जखमी केल्याची घटना २८ सप्टेंबरच्या दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली सदर आरोपी घटनेवरुन पसार होऊन मानोरा शहरात दाखल झाला. मानोरा पोलिसांना माहिती मिळताच आरोपीच्या शोधार्थ डीबी पथक रवाना होऊन तो दिसताचक्षणी आरोपीस ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला हजर केल्यानंतर घडलेल्या घटनेचा उलघडा झाला.

### डी.बी. पथकाने केली आरोपीला अटक; आरोपी कारंजा पोलिसांच्या स्वाधीन

पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीच्या आधारे कारंजा तालुक्यातील एका गावातील फिर्यादीने म्हटले की माझी मुलगी १२ व्या वर्गात शिक्त आहे तिची सोयरीक वय१८ वर्ष पूर्ण झाल्यावर करायचे ठरले होते मात्र सदर आरोपी दारू व गांज्याच्या आहारी असल्याची खातरजमा झाल्यामुळे आम्ही सोयरीक मोडली.याची विचारणा करण्यासाठी आरोपी आकाश अवधूत इंगळे रा गौतम नगर कारंजा हा आमच्या घरी सायंकाळी येऊन सोयरीक का मोडली म्हणून वाद घालत होता. २८ सप्टेंबर रोजी १२ च्या दरम्यान मी माझी पत्नी व मुलगी कारंजा येथे आलो असता नेहरू चौक येथे आरोपीने माझ्या मुलीचे केस पकडून खाली पाडले व तिच्या गळयावर चाकूने जबर वार करून तेथून पळून गेला.अश्या आशयाची फिर्याद कारंजा शहर पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली.

सदर घटनेची वार्ता पोलीस उपविभागीय अधिकारी जगदीश पांडे यांनी मानोरा पोलीस निरीक्षक ब्रम्हदेव शेळके याना दूरध्वनीवर संपर्क साधून आरोपी बाबत सूचना केल्या.याबाबत डी बी पथकाचे बालाजी महल्ले, मयुरेश तिवारी हे पेट्रोलिंगवर असताना गळा चिरून आलेला आरोपीच्या टी शर्ट वर रक्त असल्याची गंभीर बाब दिसून आली.क्षणाचा ही विलंब न लावता संशयित आरोपीला मानोरा पोलिसात दाखल केले ठाणेदार ब्रम्हदेव शेळके यांनी आरोपी मानोरा पोलीस स्टेशनमध्ये जमा असल्याची बाब कारंजा शहर पोलीसांना कळविले .सदर तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सुनील खंडारे,प्रतीक राऊत, शेरू गारवे, उमेशकुमार बिबेकर, सचिन राठोड यांचा ताफा आरोपी घेण्यासाठी दाखल झाला. सदर गुन्हयातील आरोपी आकाश अवधूत इंगळे रा गौतम नगर कारंजा यांच्या विरूद्ध कलम भांदवी प्रमाणे ३०७ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (श.प्र.)